## ❖ ५ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय दानधर्म दिवस साजरा :-

- संयुक्त राष्ट्र संघ आज ५ सप्टेंबरला 'आंतर राष्ट्रीय दान धर्म दिवस ' साजरा करीत आहे. हा दिवस जागतिक स्तरावर एकजुटीची भावना व्यक्त करते आणि विशेषत: गरीब आणि सर्वात असुरक्षित लोकांच्या गरजा पूर्ण करण्यावर भर देते.
- हा दिवस सूक्ष्म उपक्रमे ते सहकारी संस्था ते बहू राष्ट्रीय कंपन्या आणि नागरी समाज संस्था आणि लोकोपकारी संस्था अश्या विविध खाजगी क्षेत्रांची नव्या कार्यक्षेत्राच्या अमलबजावणी मध्ये भूमिका दर्शवते.
- तसेच १९७९ साली नोबेल शांति पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या कोलकता येथे सेवा देणाऱ्या मदर टेरेसा यांची पुण्यतिथी साजरी करण्याकरिता ५ सप्टेंबर या तारखेची निवड करण्यात आली.
- मदर टेरेसा या एक अल्बेनियन - भारतीय रोमन कॅथोलिक साध्वी आणि मिशनरी होत्या. त्यांचा जन्म स्कोपजे येथे झाला होता. १८ वर्षे मॅसिडोंनीया मध्ये वास्तव्यानंतर त्या आयर्लंड मध्ये आल्या आणि तेथून मग त्या भारतात आल्या, येथे त्यांनी त्यांचे उरलेले आयुष्य घालविले, ५ सप्टेंबर १९९७ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.
- मानवतावादी संकटात आणि मानवी दू:ख कमी करण्यासाठी आणि यासाठी होणाऱ्या देशांमधील धर्मादाय संस्था आणि व्यक्तींच्या प्रयत्नांच्या सन्मानार्थ आणि मदर टेरेसा यांच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्र संघाने ठरवमधून ५ सप्टेंबर या तारखेला 'आंतरराष्ट्रीय दानधर्म दिवस' म्हणून पाळण्याचे स्वीकारले.

## • पहिला भारत - बांग्ला चित्रपट 'दूब' २७ औक्टोबरला झळकणार :-

- बांग्लादेश आणि भारत या देशांनी एकत्रितपणे तयार केलेला 'दूब' हा चित्रपट दोन्ही देशांमध्ये २७ ऑक्टोबर२०१७ रोजी पड्द्यावर झळकणार.
- दूब चित्रपटाला मॉस्को इंटर नॅशनल फिल्म फेस्टिवल पुरस्कार देखील मिळाला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक मोस्तोफा सरवार फारुकि हे आहेत.
- चित्रपटाची निर्मिती बांग्लादेशच्या जाझ मल्टीमिडिया आणि भारताच्या इस्के मुवीज या कंपंनींनी केलेली आहे.
- चित्रपटात भारतीय अभिनेता इरफान खान आणि अभिनेत्री पारनो मित्रा तसेच बांगलादेशचे नुसरत इम्रोस तिषा आणि रोकेया प्रची यांनी भूमिका केलेल्या आहेत.